# मराठी विभाग सत्र २०२४—२५

## शैक्षणिक अभ्यास सहल

इंदिरा गांधी कला—वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर, जि. नागपूर या महाविद्यालयातील मराठी विभागाद्वारे एक दिवसीय शैक्षणिक अभ्यास सहल दिनांक ०८.०१.२०२५ ला आयोजित करण्यात आलेली होती. ही सहल वर्धा, पवनार येथील विनोबा भावे आश्रमात येथे नेलेली होती. या शैक्षणिक अभ्यास सहलीमध्ये एकूण ४६ विद्यार्थी व ६ प्राध्यापक सहभागी झालेले होते.









या प्रसंगी वर्धा येथील गांधी विचार परिषद येथे मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी भेट दिली.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा
# दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी



**महाविद्यालयात "मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा"निमित्त दि. २१.०१.२०२५ ला "निबंध स्पर्धा" आयोजित करण्यात आलेली होती. निबंध स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदविला.**



**"मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा"निमित्त महाविद्यालयात दि. २८.०१.२०२५ ला** समारोपीय कार्यक्रम आयोजीत करण्यात आलेला होता. या कार्यक्रमाचे **अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय चिकाटे हे होते.**

# मराठी भाषा गौरव दिन




**महाविद्यालयात** दि. २७ फेब्रुवारी २०२५ ला **वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस हा "मराठी भाषा गौरव दिवस" म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय चिकाटे हे होते.**

# इंदिरा गांधी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा




**कळमेश्वर :** येथील इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालयात गुरुवार दिनांक 27 फेब्रुवारी 2025 ला सकाळी साडेअकरा वाजता मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय चिकाटे होते. प्रमुख अतिथी पीपल्स वेल्फेअर सोसायटीचे सदस्य धर्मेंद्र बनसोड उपस्थित होते. मराठीतील थोर साहित्यिक, कवी, नाटककार, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात येतो. यावेळी बोलताना डॉ. अजय चिकाटे म्हणाले, 'कुसुमाग्रज हे मराठी साहित्याला पडलेले सुंदर स्वप्न होते.' त्यांची कविता ही राष्ट्रपुजक असून प्रेम, सामाजिक आणि विषमता अशा अनेक पातळ्यावर ती समृद्ध आहे. मराठी भाषेचा गौरव केवळ साहित्यातून न होता प्रत्यक्ष व्यवहारातून व सर्वांच्या कृतीतून तो सिद्ध व्हायला हवा. या कार्यक्रमात धर्मेंद्र बनसोड यांनी, 'मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला. हा मराठी भाषेचा गौरवच आहे. पण हा गौरव टिकविणे हे मराठी माणसाला एक आव्हान ठरणार आहे. मात्र प्रत्येक मराठी माणसाने ठरविले तर ते कठीण नाही.' असे उद्गार काढले. मराठी विभाग प्रमुख डॉ. हेमंत बागडे यांनी प्रास्ताविकातून मराठी भाषेचे प्राचिनत्व विशद केले व कुसुमाग्रजांबद्दल माहिती दिली. संचालन प्रा. मंजुषा कापसे यांनी केले. यावेळी प्रा. राजेश घोडेस्वार, डॉ. राजेंद्र कांबळे, डॉ. मंजुषा ढोबळे, प्रा. आश्विन सरोदे, प्रा. रोशन भगत, प्रा. दीपा बिडकर, प्रवीण पाटील, कवडू बागडे, चेतर्ना यांच्यासह अनेक विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी कुसुमाग्रजांच्या पाच कवितांचे वाचन करून अभिवादन केले.

## विशेष व्याख्यानमाला






महाविद्यालयात मराठी विभाचे वतीने पीपल्स वेलफेअर सोसायटी, नागपूर या संस्थेचे संस्थापक डॉ. मधुकरराव वासनिक यांच्या प्रथम स्मृती दिनाप्रित्यर्थ डॉ. सूनील रामटेके, प्राध्यापक तथा मराठी विभागप्रमुख एस.एन.डी.टी. महीला विद्यापीठ मुंबई यांचे ‘अभिजात मराठी : भवितव्य आणि संवर्धन’ या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आलेले होते. या व्याख्यानमालेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय चिकाटे होते.